मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र १९८/२०१५ मध्ये पारित केलेल्या आदेशांनुसार अर्जदार श्री. सचिन शांताराम सोनवणे यांना भरपाई अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक - न्यायप्र-१२१७/प्र.क्र.७९१/विशा-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक - ०७ डिसेंबर, २०१७.

वाचा :- मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथील क्रिमीनल रिट याचिका क्र. १९८/२०१५ मध्ये दि.२२.११.२०१७ रोजी दिलेले आदेश.

प्रस्तावना :-

श्री. सचिन शांताराम सोनवणे, रा. मुंबई यांनी त्यांना पोलीसांनी बेकायदेशीर पणे ताब्यात ठेवल्याबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे क्रिमीनल रिट याचिका क्र. १९८/२०१५ दाखल केली होती. सदर याचिकेच्या अनुषंगाने दि. २२.११.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीत मा. न्यायालयाने याचिकाकर्त्यास आदेशाच्या दिनांकापासुन ४ आठवड्यांच्या कालावधीत भरपाई म्हणून रूपये ५०,०००/- इतकी रक्कम तसेच सदर रकमेवर प्रस्तुत याचिका दाखल केल्याच्या दिनांकापासुन वार्षिक ८ % दराने व्याज देण्याबाबत तसेच सदर याचिकेच्या खर्चापोटी रूपये १०,०००/- इतकी रक्कम देण्याबाबत आदेश पारित केले आहेत. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी पारित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने श्री. सचिन शांताराम सोनवणे यांना भरपाईची रक्कम देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी क्रिमीनल रिट याचिका क्र. १९८/२०१५ मध्ये दि. २२.११.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशांनुसार अर्जदार श्री. सचिन शांताराम सोनवणे यांना भरपाई म्हणून रूपये ५०,०००/- एवढी रक्कम तसेच सदर रकमेवर प्रस्तुत याचिका दाखल केल्याच्या म्हणजेच दिनांक १३.०२.२०१५ पासुन वार्षिक ८ % दराने व्याज तसेच सदर याचिकेच्या खर्चापोटी रूपये १०,०००/- इतकी रक्कम अदा करण्यास याव्दारे मजूरी देण्यात येत आहे.

२. सदर आर्थिक भरपाई श्री. सचिन शांताराम सोनवणे यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर रक्कम श्री. सचिन शांताराम सोनवणे यांना अदा करून त्याची पोचपावती शासनास व मा. न्यायालयास विहीत मुदतीत सादर करावी.

४. उपरोक्त प्रकरणी होणारा खर्च मागणी निर्णय क्र. बी-१, २०५५-पोलीस(००)१०९, जिल्हा पोलीस (००)(००)(०१) पोलीस बल, ५०-इतर खर्च (२०५५ ०१६८) या लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील तरतुदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७१२०७१६५००९१५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

V. M. Bhat

Digitally signed by V. M. Bhat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, cn=V. M. Bhat
Date: 2017.12.07 16:55:25 +05'30'

(व्यं. मा. भट)
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. रजिस्ट्रार, मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, औरंगाबाद.
३. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.
४. अति. शासकीय अभियोक्ता, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद.
५. पोलीस अधीक्षक, अहमदनगर.
६. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुबई/नागपूर.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.
८. उप सचिव, गृह विभाग (अर्थसंकल्प-१), मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती/विशा-६.